# NATIONAL LOK ADALAT

# राष्ट्रीय लोकअदालत



## सामंजस्य आणि तडजोडीने जीवन सुखी बनवूया, चला आपण लोक न्यायालयाच्या मार्गाने जाऊया.

दुरावलेले संबंध व प्रलंबित असलेली प्रकरणे तसेच दाखलपूर्व प्रकरणे सामंजस्याने मिटविण्याकरीता महाराष्ट्रातील उच्च न्यायालय व खंडपीठे, सर्व जिल्हा न्यायालये, तालुका न्यायालये, कौटुंबिक न्यायालये, इतर न्यायालये व न्यायाधिकरणे येथे राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली (National Legal Services Authority) यांच्या आदेशान्वये दिनांक **१४ डिसेंबर, २०२४** रोजी **"राष्ट्रीय लोकअदालत"** आयोजित करण्यात येत आहे.

तरी महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणातर्फे आवाहन करण्यात येते की, न्यायालयात दाखल झालेली प्रकरणे राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये ठेवण्याकरीता संबंधितांनी आपली प्रकरणे ज्या न्यायालयात प्रलंबित असतील त्या न्यायालयात अर्ज करावा. तसेच दाखलपूर्व प्रकरणाबाबत नजीकच्या जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा तालुका विधी सेवा समितीकडे अर्ज करावा व दि. १४ डिसेंबर, २०२४ रोजी आयोजित केलेल्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये आपली प्रकरणे सामंजस्याने व तडजोडीने मिटवावीत.

**१४ डिसेंबर २०२४**

## खालील प्रकारची प्रकरणे राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये ठेवता येतील.

**दाखलपूर्व प्रकरणे :**

अ. निगोशिएबल इन्स्ट्रुमेन्टस् ॲक्ट च्या कलम-१३८ खाली दाखल होण्यापूर्वीची प्रकरणे

ब. बँक वसुली प्रकरणे (Bank Recovery Cases)

क. कामगार वाद प्रकरणे (Labour Dispute Cases)

ड. वीज व पाणी यांच्या देयकाबाबतची प्रकरणे (तडजोडीस अपात्र प्रकरणे वगळून) (Electricity & Water Bills (Excluding Non-Compoundable)

इ. इतर (फौजदारी तडजोडपात्र, वैवाहिक व इतर दिवाणी प्रकरणे) (Criminal Compoundable, Matrimonial & Other Civil Disputes)

**न्यायालयात प्रलंबित असलेली खालील प्रकरणे :**

१. फौजदारी तडजोडपात्र प्रकरणे (Criminal Compoundable Offence)

२. निगोशिएबल इन्स्ट्रुमेन्टस् ॲक्ट च्या कलम-१३८ खाली दाखल झालेली प्रकरणे (N.I.Act Cases u/s 138)

३. पैसे वसुलीची प्रकरणे (Money Recovery Cases)

४. अपघात न्यायाधिकरणाबाबतची प्रकरणे (MACT Cases)

५. कामगार वाद प्रकरणे (Labour Disputes Cases)

६. वीज व पाणी यांच्या देयकाबाबतची प्रकरणे (तडजोडीस अपात्र प्रकरणे वगळून) (Electricity & Water Bills [Excluding Non-compoundable])

७. वैवाहिक वादाबाबतची प्रकरणे (Matrimonial Disputes Cases)

८. भूसंपादन बाबतची प्रकरणे (Land Acquisition Cases)

९. नोकरी बाबतची प्रकरणे ज्यात पगार, इतर भत्ते व निवृत्तीबाबतचे फायदे (Service Matters relating to pay and allowances and retiral benefits)

१०. महसूल बाबतची प्रकरणे (जिल्हा न्यायालय व उच्च न्यायालयात प्रलंबित असलेली प्रकरणे) (Revenue Cases [Pending in District Court & High Courts only])

११. इतर दिवाणी प्रकरणे (भाडे, सुविधाधिकार बाबतचे, हक्क, हुकूमाबाबतची प्रकरणे, विनिर्दिष्ट पालन प्रकरणे) इत्यादी (Other Civil Cases [Rent, Easementary rights, Injunction Suits, Specific Performance Suits etc.)

१२. बौध्दिक मालमत्ता अधिकार प्रकरणे (आयपीआर) /ग्राहक प्रकरणे / इतर कोणत्याही अर्ध-न्यायिक प्राधिकरणासमोर प्रलंबित प्रकरणे. (IPR matters / Consumer matters / also other matters pending before any other quasi-judicial authority)

## ठळक वैशिष्ट्ये :

- न्यायाधीश, तज्ञ वकील व सामाजिक कार्यकर्ते यांचे मंडळ आपणास मदत करेल.
- कोणत्याही प्रकारची फी भरावी लागणार नाही.
- लोकन्यायालयाच्या निवाड्याविरुध्द अपील नाही.
- न्यायालयाच्या हुकूमनाम्याप्रमाणे लोकन्यायालयात होणाऱ्या निवाड्याची अंमलबजावणी कोर्टामार्फत करता येते.
- खटल्यांमध्ये साक्षी-पुरावा, उलटतपासणी, दिर्घ युक्तिवाद या बाबी टाळल्या जातात.
- लोकन्यायालयात निकाली निघणाऱ्या प्रकरणामध्ये कायद्यानुसार कोर्ट फी ची रक्कम परत मिळते.

मागील दोन राष्ट्रीय लोकअदालतींमध्ये एकूण ३५,८८,९२० प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

**मग वाट कसली पाहताय? चालून आलेल्या संधीचा त्वरीत लाभ घ्या आणि परस्परातील वादांना पूर्णविराम द्या.**

## महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई

105, उच्च न्यायालय (पीडब्ल्यूडी) इमारत, फोर्ट, मुंबई - 400 032 • वेबसाईट : legalservices.maharashtra.gov.in • ई-मेल : mslsa-bhc@nic.in • फोन : (022) 22691395 / 22691358 • टोल फ्री : 15100

उच्च न्यायालय विधी सेवा समिती : मुंबई : 8591903603 / नागपूर : 8591903938 / औरंगाबाद : 8591903617 / मुंबई जिल्हा : 8591903601 / मुंबई उप नगर : 8591903602

**संपर्क**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अहमदनगर | 8591903616 | धुळे | 8591903618 | नांदेड | 8591903626 | सांगली | 8591903610 |
| अकोला | 8591903930 | गडचिरोली | 8591903933 | नंदूरबार | 8591903939 | सातारा | 8591903611 |
| अमरावती | 8591903627 | गोंदिया | 8591903935 | नाशिक | 8591903615 | सोलापूर | 8591903613 |
| औरंगाबाद | 8591903620 | जळगांव | 8591903619 | उस्मानाबाद | 8591903625 | सिंधुदूर्ग | 8591903607 |
| बीड | 8591903623 | जालना | 8591903621 | परभणी | 8591903622 | ठाणे | 8591903604 |
| भंडारा | 8591903936 | कोल्हापूर | 8591903609 | पुणे | 8591903612 | वर्धा | 8591903932 |
| बुलढाणा | 8591903628 | लातूर | 8591903624 | रायगड | 8591903606 | वाशिम | 8591903937 |
| चंद्रपूर | 8591903934 | नागपूर | 8591903931 | रत्नागिरी | 8591903608 | यवतमाळ | 8591903629 |